**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०७ यांची जबानी**
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

**माझे नाव : प्रकाश शिवाजी गडाख**
वय : ५९ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त,
राहणार : वांबोरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

**शपथेवर सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.डी.एल. वाडेकर :**

मी जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग–१ सहकारी संस्था, अहमदनगर या कार्यालयात प्रथम अप्पर उपलेखापरिक्षक सहकारी संस्था, नगर तालुका म्हणुन कार्यरत होतो. मी श्री.सी.बी. गव्हाणकर यांना ओळखतो कारण ते जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग–१ म्हणुन कार्यरत होते.

२. दि.१६/०२/२०१८ रोजी मला आर्थिक गुन्हे शाखा यांनी आमच्या कार्यालयात पत्र देवुन पंच म्हणुन हजर राहण्याकामी कळविले होते. त्यानंतर माझे वरिष्ठ श्री.गव्हाणकर यांनी मला पंच म्हणुन हजर राहण्यासाठी लेखी आदेशित केले होते. आता मला सदरचा आदेश दाखविण्यात आला. त्यावर माझे वरिष्ठ श्री. गव्हाणकर यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९५** देण्यात येतो.

३. त्यानुसार दि.१६/०२/२०१८ मी रोजी मी आर्थिक गुन्हे शाखा, नगर येथे हजर राहिलो. त्यानंतर तत्कालीन डी.वाय.एस.पी. भुसारे यांनी मार्केटयार्ड येथे महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानुसार मी तेथे पोहोचलो. त्यावेळी मी पाहिले की, त्या कार्यालयात शैलजा दाणी व महाले हे उपस्थित होते. त्यावेळी भुसारे साहेबांनी महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ येथे झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत आम्हाला सांगितले व त्या संबंधित दप्तर जप्त करावयाचे आहे हे सांगितले.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.07.28 15:09:10 +0530
Addl. Chief Judicial Magistrate,
Court No.13, Ahmednagar

४. त्यानंतर आमच्यासमक्ष दप्तर जप्त करावयाची कार्यवाही सुरू झाली. त्यावेळी संबंधित कार्यालयाचे कर्मचा–याने आम्हाला दप्तर दाखविले. त्यावेळी महाले व शैलजा दाणी यांनी दप्तराची मागणी केली. त्यावेळी पहिल्यांदा कॅशबुक मागण्यात आले व त्याची पाहणी करून ते जमा करण्यात आले. त्यानंतर माल देण्यात आल्यासंबंधिचे कागदपत्रे हे जमा करण्यात आले. माल दिल्यानंतर ज्या रकमा प्राप्त झाल्या त्याच्या पावत्या देखील जप्त करण्यात आल्या. त्यानंतर सर्व कागदपत्रे माझेसमक्ष जप्त करण्यात आले. त्याबाबतचा जप्ती पंचनामा देखील माझेसमक्ष करण्यात आला. आता मला दि.१६/०२/२०१८ रोजीचा नि.क्र.१७५ वरील पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. तसेच सदरील पंचनाम्याच्या प्रत्येक पानावर देखील माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे.

५. आता साक्षीदाराला जप्त केलेले सन २०१२ ते ३१/०३/२०१३ रोजीचे कॅशबुक दाखविण्यात आले. त्या कॅशबुकचे शेवटचे पान म्हणजेच अ.क्र.१८४ वर माझी सही देखील मी केली होती. ती तीच सही आहे. त्या सहीस **नि.क्र.१९६** देण्यात येतो.

६. आता साक्षीदाराला जप्त केलेले सन २०१३ ते सन २०१४ चे कॅशबुक दाखविण्यात आले. त्या कॅशबुकचे शेवटचे पान म्हणजेच अ.क्र.१०६ वर माझी सही देखील मी केली होती. ती तीच सही आहे. त्या सहीस **नि.क्र.१९७** देण्यात येतो.

७. आता साक्षीदाराला जप्त केलेले सन २०१४ ते सन २०१५ रोजीचे भाग १ कॅशबुक दाखविण्यात आले. त्या कॅशबुकचे शेवटचे पान म्हणजेच अ.क्र.१९३

वर माझी सही देखील मी केली होती. ती तीच सही आहे. त्या सहीस **नि.क्र.१९८** देण्यात येतो.

८. आता साक्षीदाराला जप्त केलेले सन २०१४ ते सन २०१५ रोजीचे भाग २ कॅशबुक दाखविण्यात आले. त्या कॅशबुकचे शेवटचे पान म्हणजेच अ.क्र.५१ वर माझी सही देखील मी केली होती. ती तीच सही आहे. त्या सहीस **नि.क्र.१९९** देण्यात येतो.

९. आता साक्षीदाराला जप्त केलेले सन २०१५ ते सन २०१६ रोजीचे कॅशबुक दाखविण्यात आले. त्या कॅशबुकचे शेवटचे पान म्हणजेच अ.क्र.१८३ वर माझी सही देखील मी केली होती. ती तीच सही आहे. त्या सहीस **नि.क्र.२००** देण्यात येतो.

१०. आता साक्षीदाराला जप्त केलेले सन २०१६ ते सन २०१७ रोजीचे भाग १ कॅशबुक दाखविण्यात आले. त्या कॅशबुकचे शेवटचे पान म्हणजेच अ.क्र.२११ वर माझी सही देखील मी केली होती. ती तीच सही आहे. त्या सहीस **नि.क्र.२०१** देण्यात येतो.

११. आता साक्षीदाराला जप्त केलेले सन २०१६ ते सन २०१७ रोजीचे भाग २ कॅशबुक दाखविण्यात आले. त्या कॅशबुकचे शेवटचे पान म्हणजेच अ.क्र.२० वर माझी सही देखील मी केली होती. ती तीच सही आहे. त्या सहीस **नि.क्र.२०२** देण्यात येतो.

१२. आता साक्षीदाराला महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे टॅक्स इनव्हॉईस पावत्या अ.क्र.१ ते ६१ दाखविण्यात आल्या. त्या त्याच पावत्या आहेत

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.07.28 15:09:21 +0530
Addl. Chief Judicial Magistrate,
Court No.13, Ahmednagar

ज्या माझेसमक्ष जप्त करण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांच्या शेवटच्या पानावर मी सही केली होती. सदर सहीस **नि.क्र.२०३** देण्यात येतो.

१३. आता साक्षीदाराला महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे टॅक्स इनव्हॉईस पावत्या अ.क्र.१ ते ५० दाखविण्यात आल्या. त्या त्याच पावत्या आहेत ज्या माझेसमक्ष जप्त करण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांच्या शेवटच्या पानावर मी सही केली होती. सदर सहीस **नि.क्र.२०४** देण्यात येतो.

१४. आता साक्षीदाराला महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे टॅक्स इनव्हॉईस पावत्या अ.क्र.१ ते ६५ दाखविण्यात आल्या. त्या त्याच पावत्या आहेत ज्या माझेसमक्ष जप्त करण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांच्या शेवटच्या पानावर मी सही केली होती. सदर सहीस **नि.क्र.२०५** देण्यात येतो.

१५. आता साक्षीदाराला महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे टॅक्स इनव्हॉईस पावत्या अ.क्र.१ ते ४२ दाखविण्यात आल्या. त्या त्याच पावत्या आहेत ज्या माझेसमक्ष जप्त करण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांच्या शेवटच्या पानावर मी सही केली होती. सदर सहीस **नि.क्र.२०६** देण्यात येतो.

१६. आता साक्षीदाराला महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे टॅक्स इनव्हॉईस पावत्या अ.क्र.१ ते ५९ दाखविण्यात आल्या. त्या त्याच पावत्या आहेत ज्या माझेसमक्ष जप्त करण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांच्या शेवटच्या पानावर मी सही केली होती. सदर सहीस **नि.क्र.२०७** देण्यात येतो.

१७. आता साक्षीदाराला महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे टॅक्स इनव्हॉईस पावत्या अ.क्र.१ ते ३४ दाखविण्यात आल्या. त्या त्याच पावत्या आहेत

ज्या माझेसमक्ष जप्त करण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांच्या शेवटच्या पानावर मी सही केली होती. सदर सहीस **नि.क्र.२०८** देण्यात येतो.

१८. आता साक्षीदाराला महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे टॅक्स इनव्हॉईस पावत्या अ.क्र.१ ते ६१ दाखविण्यात आल्या. त्या त्याच पावत्या आहेत ज्या माझेसमक्ष जप्त करण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांच्या शेवटच्या पानावर मी सही केली होती. सदर सहीस **नि.क्र.२०९** देण्यात येतो.

१९. आता साक्षीदाराला महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे टॅक्स इनव्हॉईस पावत्या अ.क्र.१ ते १५७ दाखविण्यात आल्या. त्या त्याच पावत्या आहेत ज्या माझेसमक्ष जप्त करण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांच्या शेवटच्या पानावर मी सही केली होती. सदर सहीस **नि.क्र.२१०** देण्यात येतो.

२०. आता साक्षीदाराला महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे टॅक्स इनव्हॉईस पावत्या अ.क्र.१ ते ५५ दाखविण्यात आल्या. त्या त्याच पावत्या आहेत ज्या माझेसमक्ष जप्त करण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांच्या शेवटच्या पानावर मी सही केली होती. सदर सहीस **नि.क्र.२११** देण्यात येतो.

२१. आता साक्षीदाराला महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ यांचे कार्यालयात रकमा प्राप्त झालेल्या पावत्या ज्या वितरकांच्या नावाने होत्या त्या अ.क्र.१ ते ५८ वर असणा-या दाखविण्यात आल्या. त्या त्याच पावत्या आहेत ज्या माझेसमक्ष जप्त करण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांच्या शेवटच्या पानावर मी सही केली होती. सदर सहीस **नि.क्र.२१२** देण्यात येतो.

सरतपास पुर्ण.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.07.28 15:09:32 +0530
Addl. Chief Judicial Magistrate, Court No.13, Ahmednagar

**शपथेवर उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे त्यांचे वकील श्री. मोरे यांचेमार्फत :**

२२. हे म्हणणे खरे आहे की, मला सरतपासात दाखविण्यात आलेले रेकॉर्ड हे शैलजा दाणी यांनी काढुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा हा पोलीस स्टेशनमध्ये तयार करणात आला व मी त्यावर सही केली होती. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, रेकॉर्ड हे कार्यालयातच पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, मला सरतपासात दाखविण्यात आलेल्या कागदपत्रांवरील सहया या मी पोलीस स्टेशनमध्ये बसुन केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळाच्या कार्यालयात गेलोच नव्हतो व तेथे माझेसमक्ष रेकॉर्ड जप्तच करण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात ज्या कागदपत्रांवर सहया केल्या असे कथन केलेले आहे त्या सहया दुपारी ०२.०० ते ०२.३० च्या दरम्यान केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी पंच म्हणुन मी हजर राहिलो होतो त्यावेळी मी सरकारी नोकरीत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे वरिष्ठांनी मला सांगितले होते की, पोलीस स्टेशनमध्ये जावुन पोलीस सांगतील त्याठिकाणी सहया करा. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा आहे.

**आरोपी क्र.१ तर्फे उलटतपास पुर्ण.**

**शपथेवर उलटतपास आरोपी क्र.२ व ३ तर्फे त्यांचे वकील श्री.व्ही.आर. गुंदेचा यांचेमार्फत सुरू :**

२३. नि.क्र.१९५ वरील लेखी आदेशान्वये माझे वरिष्ठांनी मला पंचनाम्याकामी पंच म्हणुन हजर राहण्याकामी आदेशित केल्यानंतर, मी पंच म्हणुन हजर राहण्यास तयार आहे असे लेखी संमतीपत्र मी माझे वरिष्ठांना तसेच संबंधित डी.वाय.एस.पी. यांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, वरिष्ठांच्या सांगण्यानुसार मला काम करावे लागत असे. (आता साक्षीदाराला नि.क्र.१९५ वरील लेखी आदेश

दाखविण्यात आला.) नि.क्र.१९५ वरील पत्रान्वये दि.१५/०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता आर्थिक गुन्हे शाखा, नगर येथे हजर राहण्याकामी मला आदेशित करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९५ वरील पत्रान्वये १६ तारखेला हजर राहण्याकामी मला आदेशित करण्यात आले नव्हते व मी हजर राहण्याचे देखील काही कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.१५/०२/२०१८ रोजी भुसारे साहेब यांनी ज्या ज्या कागदपत्रांवर मला सहया करायला सांगितल्या होत्या त्याठिकाणी मी सहया केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१७५ वरील पंचनाम्यावर महाले हजर असल्याबाबत त्यांची कोठेही सही नाही.

२४. हे म्हणणे खरे नाही की, मी सरकारी नोकरीत कार्यरत असताना आमच्या कार्यालयात हालचाल रजिस्टर ठेवले जात होते व कार्यालयीन कामानिमित्त बाहेर जावयाचे असल्यास त्याठिकाणी नोंद केली जात असे. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, ते सरकारी कामानिमित्त बाहेर जात असल्यास त्याची नोंद त्यांचे डायरीमध्ये करत असत.

**प्रश्न** – नि.क्र.१७५ वरील पंचनाम्यातील संपुर्ण मजकुर तुम्ही सांगितला व पोलीसांनी त्यानुसार लिहुन घेतला असे घडले काय?

**उत्तर** – सुरूवातीचा मजकुर आम्ही सांगितला नव्हता तो पोलीसांनीच लिहीला होता, त्यानंतरचा मजकुर आमच्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला.

२५. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१७५ वरील संपुर्ण मजकुर हा शैलजा दाणी यांनी सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की, ज्याठिकाणी मी सहया करतो त्याखाली तारीख देखील टाकत असतो. नि.क्र.१९६ ते नि.क्र.२१२ यावरील ज्या सहया मी केल्या होत्या त्याखाली तारीख टाकलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी नि.क्र.१९६ ते नि.क्र.२१२ वरील ज्या सहया केल्या आहेत त्या सहया आर्थिक गुन्हे शाखा, नगर येथे मला ज्यादिवशी बोलवण्यात आले त्या दिवशी केलेल्या

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.07.28 15:09:44 +0530
Addl. Chief Judicial Magistrate, Court No.13, Ahmednagar

आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र.२ व ३ तर्फे उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे सरकारी वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.07.28 15:09:49 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.२८/०७/२०२६**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१३, अहमदनगर.